# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

**3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.**

दूरध्वनी – 022-68597470,68597431. फॅक्स – 22692102, 22690007.

E-mail : desk11@dtemaharashtra.gov.in Internet:- http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- 11/तंशिसं/दरपत्रक/झेरॉक्स दरकरार/2022/339

दिनांक :- 16/02/2022

प्रति,

1. नोटीस बोर्ड, कार्यासन क्र.11, मुख्य कार्यालय, मुंबई
2. संकेतस्थळ, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई
3. _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

**विषय :- कार्यालयासाठी झेरॉक्स मशिनसह झेरॉक्स, प्रिंटींग या सेवा घेण्याकरीता दरकरार करण्यासाठी बंद लखोटयात दरपत्रके मागविण्याबाबत.**

या संचालनालयातील आस्थापना विभागासाठी झेरॉक्स मशिनसह, झेरॉक्स, प्रिंटींग या सेवा घेण्याकरीता दर करार करण्यासाठी बंद लखोटयात दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रके दि.25**/02 /2022** पर्यंत कार्यासन क्र.11 मध्ये ठेवलेल्या पेटीमध्ये दु. 4.00 वाजेपर्यंत सादर करावयाची आहेत. प्राप्त झालेली दरपत्रके दि. **25/02 /2022** रोजी सकाळी 11.30 वाजता उघडण्यात येतील. उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

## अटी व शर्ती

1.दरपत्रके सोबतच्या नमुन्यात (form) मध्येच निविदा/दरपत्रके सादर करावीत. स्वत:चा नमूना वापरू नये. मात्र स्वत:च्या कार्यालयीन लेटरहेडसह या कार्यालयाने दिलेला विहीत नमूना सादर करता येईल. तसेच ***दरपत्रके इ-मेल व्दारे सादर करु नये.***

2. दरपत्रकाच्या किंमती व अन्य संदर्भाचा वैधता कालावधी स्पष्टपणे नमूद केला पाहिजे. दरपत्रके निविदा उघडण्याच्या तारखेपासून 90 दिवसापर्यंतचे असावे.

3. देयके काम समाधानकाररित्या पूर्ण केल्यानंतर अदा केली जातील.

4. दरपत्रके कोणतेही कारण न दाखवता रद्द करण्याचा हक्क या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

5.सदर दर पुरवठा आदेश दिल्याच्या दिनांकापासून 1 वर्ष कालावधीकरीता स्थिर असावेत व ते 1 वर्ष कंत्राट कालावधीमध्ये संबंधित पुरवठादारास बंधनकारक असतील.

6. कोणतेही कारण न देता एक किंवा अनेक निविदा नाकारण्याचा हक्क हे कार्यालय राखून ठेवीत आहे.

7. कराराच्या कालावधीसाठी झेरॉक्स मशिनची नियमित व सुरळीत देखभाल व दुरूस्ती,सुटे भाग पुरवठा व झेरॉक्स ऑपरेटरसह पुरविण्यात यावे.

8. नविन ड्युप्लेकक्स डिजीटल झेरॉक्स मशिन आदेशाच्या दिनांकापासून 7 दिवसाच्या कालावधीत स्वखर्चाने या कार्यालयात चालकासह उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल.

9. कराराच्या कालावधीत हेवी ड्युटी फोटो कॉपीयरकरिता लागणारे इंक टोनर, ड्रम, सुटे भाग व तंत्र चालक इत्यादी बाबींचा पुरवठा करण्याची जबाबदारी सेवा पुरवठादाराची असेल.

10. कामाच्या दिवसामध्ये मशिन बंद राहिल्यास ते तात्काळ दुरूस्त न केल्यास तेवढ्या बंद असलेल्या दिवसाचे भाडे मासिक सरासरीने कमी करण्यात येईल.

11. कार्यालयास पुरविलेल्या झेरॉक्स प्रति अथवा प्रिंट प्रतींची नोंद ठेवून त्यावर संबंधितांची स्वाक्षरी घ्यावी. दर महिन्याचे देयक अदा करताना या नोंदीचा ताळमेळ मशीन रीडिंगसोबत घेतला जाईल.

12. उद्योग संचालनालय किंवा माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाचा दर करार लागू करण्यात आल्यास त्या दिवसापासून निविदाधारका बरोबर केलेला दरकरार संपुष्टात येईल.

13. न्युनतम दर नमूद करणाऱ्या सेवा पुरवठादारास या कार्यालयासोबत करारनामा करावा लागेल. कराराचा नमुना या कार्यालयात उपलब्ध आहे.

14. सेवा पुरवठादाराकडून विभागाकडे प्रतिमहा सादर करण्यात येणाऱ्या देयकाच्या रक्कमेतून उत्पन्न् कर (Income Tax) त्यावरील अधिभार आणि या दोन्हीवरील शैक्षणिक कर हा विभागाकडून कापून उर्वरित देयक अदा केले जाईल.
15. यंत्र नादुरुस्त झाल्यास ते तात्काळ विनाविलंब दुरुस्त करण्याची आणि त्यामधील दुरुस्त न होण्यासारखे भाग बदलून देण्याची जबाबदारी सेवा पुरवठादाराची राहील. याकरीता तक्रार दिल्यानंतर 24 तासाच्या आत सुरळीत सेवा उपलब्ध करुन द्यावी लागेल.मशिन दुरुस्त होण्यासारखी नसल्यास, तात्काळ नवीन मशीनचा पुरवठा करणे आवश्क राहील.
16. कामाच्या दिवसांमध्ये यंत्र 24 तासांपेक्षा जास्त कालावधीकरीता बंद राहिल्यास व ते तात्काळ दुरुस्त न केल्यास तेवढया बंद असलेल्या दिवसांचे भाडे मासिक सरासरीने कमी करण्यात येईल.
17. दरपत्रक सादर करताना या  कार्यालया व्यतिरिक्त इतर कोणत्याही शासकीय /निमशासकीय कार्यालयास अशाच प्रकारची सेवा देण्याच्या पूर्वीच्या कामाचा अनुभव असल्यास त्याबाबतची कागदपत्रे /प्रमाणपत्रे जोडावीत.

स्वाक्षरी/-
( डॉ. अभय वाघ )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई.

## झेरॉक्स मशिनकरीता देखभालव दुरुस्तीसाठी दरपत्रकाचा विहित नमुना

1) कंत्राटदाराचे नाव  व पत्रव्यवहाराचा पत्ता :- _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _
_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _
_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

2) दूरध्वनी / मोबाईल क्रमांक :- _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

3) इन्कमटॅक्स पॅन नंबर (झेरॉक्स जोडावी) :- _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

4) उदयोग आधार / मुंबई महानगरपालिका नोंदणी क्रमांक (झेरॉक्स जोडावी): - _ _ _ _ _ _ _ _ _
_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

5) जीएसटी नंबर : - _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

| अ.क्र | प्रकार | प्रति नग दर रु. (सर्व कर समाविष्ट) |
|---|---|---|
| | **Rates** | |
| 1. | B/W Paper Xerox / Print Out A3 Size. **Machine All Maintenance** (Toner, Drum, Cartridge and Repairs, Spare Parts & Maintenance free of cost) | |
| 2. | B/W Paper Xerox / Print Out A4 Size. **Machine All Maintenance** (Toner, Drum, Cartridge and Repairs, Spare Parts & Maintenance free of cost) | |
| 3. | Spiral Binding A4 Size | |
| 4. | Spiral Binding A3 Size | |

## प्रतिज्ञापत्र

मी खालील सही करणार,याद्वारे घोषित करतो की, या दरपत्रकासाठी तंत्रशिक्षण संचालनालय यांनी विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. मी या दरपत्रकासोबत दिलेली सर्व माहिती खरी असून, सोबत जोडलेली सर्व कागदपत्रे मूळ प्रमाणपत्राच्या / कागदपत्राच्या सत्य प्रति आहेत. मला / मी प्रतिनिधीत्व करीत असलेल्या संस्थेस गोपनीय कागदपत्रे हाताळण्याचा अनुभव असून मी दिलेली सर्व माहिती /सोबत जोडलेली कागदपत्रे खोटी असल्याचे आढळून आल्यास त्याबद्दल माझ्यावर कायदेशीर कार्यवाही होऊ शकते याची मला पूर्ण जाणीव आहे व याबद्दलची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील.

सही :- _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

नांव :- _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _